# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.६०९२/२३/अ.क्र.६०२९/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०९३/२३/अ.क्र.६०३०/२५/०१**

**श्री. रमेश सूर्यनारायण गुप्ता**
A/९ योगी निवास (महाराष्ट्र नगर),
डहाणूकरवाडी एम.जी. रोड
कांदिवली (प.), मुंबई-४०००६७

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) आर/दक्षिण**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली (प.), मुंबई ४०००६७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली (प.), मुंबई ४०००६७

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१४.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) आर/दक्षिण विभाग श्री. रोहित घोडके उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. रमेश गुप्ता यांनी दाखल केलेल्या अपील क्र. ६०२९ व ६०३० यात दि.२४.०५.२०२३ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) आर/दक्षिण विभाग यांनी दि.०९.०६.२०२३ रोजी उत्तर दिले असून दि.०३.०७.२०२३ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर दि.२६.०७.२०२३ रोजी सुनावणी घेत तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग यांनी अपिलार्थी यांच्याशी संपर्क साधुन संयुक्तरित्या स्थळ पाहणी

करून तक्रारीवर योग्य ती कार्यवाही करून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती द्यावी, असे आदेशित केले त्याप्रमाणे संयुक्त तपासणी करण्यात आली अपिलार्थी श्री. रमेश गुप्ता यांनी अनधिकृत जल जोडणी ही कार्यालयीन अधिकाऱ्यांकडून त्वरित खंडीत करण्यात आले असून या संदर्भात अपिलार्थी यांना या आधीच कागदपत्रे देण्यात आले असून प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज हा त्याआधी दाखल केला असल्याचे आढळून येते. अपिलार्थी यांनी दाखल केलेले जोडपत्र-अ, ब व द्वितीय अपील अर्जात नमूद मुद्द्यांचे या आधीच निराकरण झाले असल्याने प्रत्यक्षात कार्यवाही झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

**आदेश**

**वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२५**

State Information Commission
Maharashtra